*Dr. Kirit Somaiya* – Ex M.P.
Chartered Accountant, Ph.D.
**National Secretary**

भारतीय जनता पार्टी
**Bharatiya Janata Party**

**कृपया प्रकाशनार्थ**

मुंबई - सोमवार दि.18 जुलै 2011

**मुंबई बॉम्बस्फोट पिडीतांची मानव अधिकार आयोगाकडे याचिका दाखल**
**मानव अधिकार आयोगाने मदत व पुनर्वसन कार्य आपल्या देखरेखीखाली करावे**
**-डॉ.किरीट सोमैया**

मुंबई बॉम्बस्फोट पिडीतांनी आज मानव अधिकार आयोगाकडे याचिका दाखल केली. भाजपाचे राष्ट्रीय सचिव डॉ.किरीट सोमैया यांच्या समवेत 2006 मधील पिडीत श्री.ऑल्विन डिकुन्हा व झवेरी बाजार येथील स्थानिक नगरसेवक श्री.जनक संघवी यांनी ही याचिका आज सकाळी आयोगाकडे दाखल केली.

बॉम्बस्फोटातील पिडीतांना मदत व पुनर्वसनाच्या कामात गोंधळ व घोटाळा असल्याचे याचिकेत म्हटले आहे. उदाहरण म्हणून 2006 मधील पिडीतांना मंजूर झालेली वैद्यकीय मदत अजुनपर्यंत मिळालेली नाही. 26 जुलै 2006च्या बॉम्बस्फोटाच्या 5व्या तिथीच्या दिवशी म्हणजेच 26 जुलै 2011 रोजी राज्य शासनानचे पत्र आले की आपल्याला देण्यात येणा-या आर्थिक मदतीसंबंधी योग्य ते करण्यात येत आहे. 22.11.2008 मधील पिडीत साबीरा खान ही अद्याप वैद्यकीय उपचारांसाठी ढोकरा खात आहे. शहीद शशांक शिंदे यांच्या कुटुंबियांना अजुन पेट्रोल पंप मिळालेला नाही.

13 जुलै 2011 च्या पिडीतांच्या कथा आणि व्यथाही तशाच आहेत. शासनाने आधी काढलेल्या आदेशानुसार मृतांना त्यांच्या वयाप्रमाणे मदत घोषित झाली. 8 वर्षापर्यंतच्या मृतांना दीड लाख रुपये व 18 वर्षावरील मृतांना 5 लाख रुपये जाहीर करण्यात आले आहेत.

9C, Neelam Nagar, Mulund East, Mumbai 400 081 ●Tel: 21634152/21639649 ● Fax: 022-21637432
E-mail: kiritsomaiya@gmail.com, ksofficemail@gmail.com ● Website : www.kiritsomaiya.com

*Dr. Kirit Somaiya* – Ex M.P.
Chartered Accountant, Ph.D.
**National Secretary**

भारतीय जनता पार्टी
**Bharatiya Janata Party**



सदर याचिकेत खालील मागण्या करण्यात आल्या आहेत –

1) मानव अधिकार आयोगा अंतर्गत मदत व पुनर्वसन व्हावे
2) विशेष समितीची स्थापना आणि तीन महिन्याच्या आत मदत व पुनर्वसन कार्य पूर्ण करावे.
3) कायमची मदत व पुनर्वसन पॉलिसी काढावी.
4) एक खिडकी पध्दतीने मदत व पुनर्वसन करावे.
5) 2006 व 2008च्या पिडीतांना मदत व पुनर्वसन कार्य त्वरित पूर्ण करावे.
6) मृतांच्या कुटुंबियाना व अपंगत्व आलेल्यांना नोकरी द्यावी.
7) पूर्ण वैद्यकीय मदत द्यावी.
8) कृत्रिम अवयव व श्रवण यंत्र द्यावीत.
9) डॉ.किरीट सोमैया यांनी 2006 व 2008च्या पिडीतांसाठी मानव अधिकार आयोगाकडे धाव घेतली होती त्यावेळी आयोगाने बॉम्बस्फोट पिडीतांसाठीच्या मदतीसंबंधी मार्गदर्शक तत्व घोषित केली होती त्या आदेशांचे तंतोतंत पालन करावे.

या याचिकेची सुनावणी पुढच्या आठवडयात होण्याची शक्यता असल्याचे डॉ.किरीट सोमैया यांनी या पत्रकात म्हटले आहे.

**प्रसिध्दी सचिव**

9C, Neelam Nagar, Mulund East, Mumbai 400 081 ●Tel: 21634152/21639649 ● Fax: 022-21637432
E-mail: kiritsomaiya@gmail.com, ksofficemail@gmail.com ● Website : www.kiritsomaiya.com